महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे**
जुने सीआयडी ऑफीस कंपाउंड, शिवाजीनगर,संगम ब्रीज जवळ, पुणे-४११००५

दुरध्वनी क्रमांक - ०२० - २५५४१५३३
फॅक्सक्रमांक - ०२० - २५५४४६३१

ई मेल - sp.railways.pune@mahapolice.gov.in

जा.क्र.आस्था/प्रलि/पोशि भरती-२०२१/ /3560

पुणे दि.२४/०५/२०२३

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र. आटीसी -०३११/प्र.क्र./२२८/पोल-५ अ, दि. १६/०६/२०११ अन्वये निर्गमीत करणेत आलेला पोलीस शिपाई सेवा प्रवेश नियम-२०११

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-ब, असाधारण क्र. २३, गृह विभाग दिनांक १८ जानेवारी २०१९ पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०१९

**विषय :-** पोलीस शिपाई भरती २०२१
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती.

****

**आदेश :-**

लोहमार्ग पुणे पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आस्थापनेवर सन २०२१ मध्ये रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदाकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणीमध्ये गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तदनंतर सदर उमेदवार वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

**महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ६३ मधील दिलेल्या अधिकारानुसार खालील उमेदवारांना लोहमार्ग पुणे पोलीस घटकाचे आस्थापनेवर "पोलीस शिपाई (गट क)" या संवर्गात सुधारित वेतन स्तर एस-७ रुपये २१७००-६९१०० व विशेष वेतन रु.७५०/- (अधिक नियमानुसार वेतन व भत्ते) या वेतनावर लोहमार्ग पोलीस मुख्यालय, खडकी पुणे येथे दिनांक २५.०५.२०२३ (म.पु.) पासून खालील नमुद अटी व शर्तींचे अधीन राहून अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.**

| अ.क्र | चेस्ट क्रमांक | उमेदवारांचे नाव | मुळ प्रवर्ग | नियुक्ती प्रवर्ग | समांतर आरक्षण | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३८६८ | वैभव सुरेश शेटे | EWS | खुला | सर्वसाधारण | १४६ |
| २ | २७९५ | नवनाथ रमेश पेटेकर | विजा-अ | खुला | सर्वसाधारण | १४० |
| ३ | ३८६३ | प्रथमेश प्रकाश करडे | EWS | खुला | सर्वसाधारण | १३९ |
| ४ | २११५ | प्रशांत शंकर शिगोटे | इमाव | खुला | सर्वसाधारण | १३९ |
| ५ | ३९५ | निलेश मारुती फडतारे | इमाव | खुला | सर्वसाधारण | १३९ |
| ६ | ३८१५ | अविनाश पोपट साठे | इमाव | खुला | सर्वसाधारण | १३८ |
| ७ | १५६५ | मयुर भारत कदम | EWS | खुला | सर्वसाधारण | १३८ |
| ८ | ९२ | कैलास रामदास किर्तीशाही | अ.जा | खुला | सर्वसाधारण | १३४ |
| ९ | ३४३७ | विनोद भरमाप्पा कांबळे | अ.जा | अ.जा. | सर्वसाधारण | १३२ |
| १० | ३५१७ | संदिप गोरख कांबळे | अ.जा | अ.जा. | सर्वसाधारण | १३० |
| ११ | २२६८ | बाळकृष्ण आप्पाराव जाधव | अ.जा | अ.जा. | सर्वसाधारण | १२९ |
| १२ | २९८६ | शंकर किसन वाडेकर | अ.जा | अ.जा. | सर्वसाधारण | ११८ |
| १३ | ७०४६ | संदीप शंकर पाटील | अ.ज | अ.ज | सर्वसाधारण | १३० |
| १४ | ७००८ | राजेंद्र श्रीरंग शिंदे | खुला | खुला | माजी सैनिक | १२८ |
| १५ | ७०११ | रवि लक्ष्मण निकम | EWS | खुला | माजी सैनिक | १२८ |
| १६ | ७००६ | यशवंत शिवाजी गायकवाड | खुला | खुला | माजी सैनिक | ११६ |
| १७ | २११२ | विशाल गोवर्धन मोरे | खुला | खुला | माजी सैनिक | १४२ |
| १८ | ७४४ | स्वप्निल सिताराम कांबळे | खुला | खुला | होमगार्ड | १२९ |
| १९ | ५१० | अजित दशरथ पाटील | अ.जा | अजा | होमगार्ड | [illegible] |
| | | | EWS | EWS | होमगार्ड | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | ४६७४ | प्रियंका राजेंद्र निकम | EWS | खुला | भूकंपग्रस्त | १२९ |
| २१ | १९३८ | अविनाश जनार्दन रेड्डी | इमाव | इमाव | भूकंपग्रस्त | १२५ |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सुचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यात येईल.

२. महाराष्ट्र शासन सा.प्र.वि.शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैद्यता तपासण्याचे अधीन राहून निव्वळ व तात्पुरती नियुक्ती करण्यात आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जातवैधता तपासणी करण्यासाठी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकित प्रत तात्काळ या कार्यालयात सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्या उमेदवारांना दिलेले नियुक्तीचे आदेश त्वरित रद्द करण्यात येतील व तुमचे विरुध्द अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

४. अंतिम गुणवत्ता यादीनुसार आपली निवड गुणवतेनुसार झाली असल्यास किंवा आपण आवेदन अर्जात नमूद केलेल्या प्रवर्गाचा दावा केलेला असल्यामुळे उक्त मागासवर्गीय आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार जातप्रमाणपत्र पडताळणीबाबतची पुर्तता करणे आपणास अनिवार्य व बंधनकारक आहे. अन्यथा भविष्यात आपणास सदर प्रवर्गातून पदोन्नतीचा लाभ देय होणार नाही.

५. याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि. २.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

६. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात चारित्र पडताळणी अहवालासंदर्भात प्रतिकुल फेर अहवाल प्राप्त झाल्यास संबंधित उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. तसेच पोलीस भरतीच्या वेळी आपण सादर केलेली शिक्षण, वय, धर्म, जात, अधिवास नॉन क्रिमीलेअ, क्रीडा, प्रकल्पग्रस्त, गृहरक्षक दल, माजी सैनिक, पदवीधर / पदवीधारक प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निर्देशक माहिती दडपून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. सदर कसुरीबाबत आपल्याविरुध्द भादवि आणि इतर कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल.

७. पोलीस शिपाई पदावर आपणास नेमणुक दिल्यानंतर आपण पोलीस भरती होण्यासाठी गैरमार्गाचा, अवैध बाबींचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणास कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही. तसेच पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यावर आपण पोलीस नियमावली १९९९ भाग-३ मधील नियम ४० अन्वये विहीत केलेली कर्तव्य पार पाडावी लागतील.

८. पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विदयालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological test) घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

९. नियुक्ती दिल्यानंतर आपणास एकूण ९ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण पोलीस प्रशिक्षण विदयालय येथे घ्यावे लागेल. मुलभूत प्रशिक्षण सक्तीचे असल्याने त्यात कोणत्याही कारणामुळे सुट/सवलत मिळणार नाही याबाबत मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

Scanned with OKEN Scanner

१०. प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही स्वरुपाची शारिरिक इजा अथवा दुखापत झाल्यास त्याबददल तुम्ही कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र होणार नाहीत.

११. प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. पोलीस दलामध्ये मुलभूत प्रशिक्षणानंतर त्यांची मोटार परिवहन विभाग, आयुधिक विभाग वगैरे विभागामध्ये आवश्यकतेप्रमाणे नेमणुक केली जाईल व ती त्यांच्यावर बंधनकारक राहील.

१२. प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिल्यानंतर आपणामध्ये दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिका-यांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास अथवा वरिष्ठ अधिका-यांशी / सहका-यांशी गैरवर्तन केल्यास अथवा रजा मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारचे खोटे दाखले / प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना / नोटीस न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

१३. महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ मधील नियम ७४ नुसार नियुक्ती दिलेल्या महिला उमेदवार यांना कमीत कमी ०१ वर्ष सतत सेवा पुर्ण झाल्यानंतर प्रसुती रजेस पात्र राहतील तसेच महिला उमेदवारांबाबत प्रसुती रजेसंदर्भात महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शा.नि.क्र.प्ररजा २०१५/प्र.क्र.२५/सेवा-६, दि.१५.०१.२०१६ मधील तरतुदी व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व रजा नियम लागू राहतील.

१४. पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधित पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पूर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पुर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणांस गैरहजर राहिल्यास / भगोडा झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम ७८ उपनियम (१) मधील viii खालील टिपनुसार तुमची सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम १२ मधील तरतुदीनुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त झालेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांना राज्यातील कोणत्याही पोलीस प्रशिक्षण केंद्रांत आवश्यक असलेले प्रशिक्षण पूर्ण करुन संबंधित परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर तो चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. तसेच सदर नियमातील उपखंड (२) मधील तरतुदीनुसार वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधित परिक्षा विहित संधीत उत्तीर्ण झाल्यास रोखून ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

१६. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) सुधारणा नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश नियम २०११) या मुख्य नियमामधील नियम ३ (१) (क) नंतर उपखंड ड समाविष्ट करण्यात आलेला असून त्यानुसार अन्य अर्हता म्हणुन पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण करणे बंधनकारक राहिल. परंतु सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्ती नंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर ०२ वर्षाचे आत परवाना धारण करण्यात यावा जर या कालावधीत हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास पोलीस शिपाई पदासाठीची निवड रदद ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल.

१७. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) सुधारणा नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम २०११ या मुख्य नियमामधील नियम १२ नंतर नियम १३ अंतर्भुत करण्यात आला असून त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४६२/कार्या-१२, दि.२८ मे २०१८ तसेच सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही/२०१८/प्र.क.४६२/कार्या-१२, दि.०३ जुलै २०१८ मधील तरतुदीनुसार आपणास नियुक्ती स्विकारल्यापासून दोन वर्षाच्या आत खालील नमूद संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MSCIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

१८. ज्या संवर्गातून / जातीच्या प्रवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती झाला आहात तो संवर्ग / प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१९. पोलीस शिपाई पदावर रुजू झाल्या तारखेपासून ३ महिन्याचे आत उमेदवाराने विहित केलेले मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२०. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शा.नि.क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर २००५ रोजी व नंतर निवड होणा-या उमेदवारास नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहिल. तथापि त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेले सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन वित्त विभाग क्रमांक अनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दि.२१ ऑगस्ट २०१४ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) या नावाने लागू होईल.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१ मार्च २०२३ नुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्त उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती उपदान लागू होईल.

२१. शासन प्ररिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७-२०००/१२, दि.२८.०३.२००५ व एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्रा) नियम २००५ मधील नियम ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दि.२८.०३.२००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे सेवेत रहाण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

२२. महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचेकडील पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ दि.२६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसूली/२०१२/२२३१, दि.२६.०४.२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई याने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नियुक्तीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे त्या प्रशिक्षणाचा खर्च म्हणून प्रतिमहिना रुपये २०००/- (अक्षरी रु.दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसूल करण्यात येईल व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल याबाबतचे हमीपत्र देणे आपणास बंधनकारक आहे.

२३. आपणास आपल्या पदाचा राजीनामा दयावयाचा झाल्यास नियुक्ती प्राधिकरणास एक महिन्याची अगावू नोटीस दयावी लागेल अथवा एक महिन्याच्या नोटीसच्या बदल्यात एक महिन्याच्या पगाराऐवढी रक्कम नियुक्ती प्राधिका-याकडे प्रथम भरावी लागेल. तसेच आपल्या विरुध्द कोणतीही चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित असता कामा नये अथवा शासकिय येणे बाकी असता कामा नये. पोलीस शिपाई पदाचा राजीनामा मंजुर झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुर्ननियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

२४. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली १९५९ भाग-१ मधील नियम क्र.७८ (१) (v) नंतर ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्याची तरतुद आहे अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

२५. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश नियम-२०११) मधील नियम १० अन्वये आपण हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण झाला असेल, किंवा होण्यापासुन सुट मिळाली नसेल तर हिंदी व मराठी भाषा परिक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२६. पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील विहीत केलेले अन्य नियम व तरतुदी तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश, परिपत्रके लागू राहतील.

२७. उमेदवारास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल तसे करणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

२८. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा दयावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपुर्वी त्यांनी या कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाजेष्ठता/२५१/२०१२, दि.१७.०८.२०१३ अन्वये स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता निश्चित करण्यात येईल.

३०. सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवा प्रवेश नियम-२०११ व महाराष्ट्र शासन गृहविभाग,शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब, दि.२६.१०.२०१७ मधील तरतूदीनुसार घटक बदली नियमावली लागू राहील.

३१. तुम्हांस पोलीस शिपाई म्हणून नियुक्ती दिल्यानंतर जर त्यांना खातेबाहय परीक्षा दयावयाच्या असल्यास त्या परीक्षेस बसणेसाठी अर्ज करणेपूर्वी तुम्ही या कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

**ठिकाण : पुणे**

**दिनांक : /०५/२०२३**

**( श्रीकांत य धिवरे ) भा.पो.से.**
**पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे**

**प्रति : संबंधीत उमेदवार**

**मार्फत,** राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, लोहमार्ग पुणे.

२/- माहितीसाठी व उमेदवारांना किट सरंजाम पुरविणे व सदर आदेशाच्या प्रती उमेदवारांना अदा करुन उमेदवार हजर झाल्याच्या दिनांकासह पुर्तता अहवाल सादर करावा.

**प्रत :** पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, लोहमार्ग पुणे

**प्रत :** कार्यालय अधीक्षक, लोहमार्ग पुणे (सेवार्थकामी)

२/- वरील नमूद उमेदवार यांना पोलीस शिपाई पदावर हजर करुन घेतलेल्या दिनांकापासून वेतन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**प्रत :** आस्थापना- ३ लोहमार्ग पुणे.

**प्रत सविनय सादर :-**

१. मा अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यांत आलेल्या उमेदवारांसाठी सुचना**

**१. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस करीता रुपये १५,०००/- ॲडव्हान्स भरणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम येताना सोबत आणणे आवश्यक आहे.**

**२. हजर होणा-या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा. आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, बाड - बिछाना, जेवणासाठी आवश्यक साहित्य सोबत आणावे.**

**३. बँक खाते, डी.सी.पी.एस. / एन.पी.एस. खाते व सेवापट उघडणेसाठी ३० ३०mm या साईजचे स्वत:चे फोटो, मूळ पॅन कार्ड व मूळ आधारकार्ड सोबत आणावे.**

**४. डीसीपीएस (DCPS) प्राण (PRAN) क्रमांक ऑनलाईन जनरेट झाल्याशिवाय सेवार्थ प्रणालीमध्ये वेतन देयक आकारणी होवु शकत नाही. वेतन आकारणीस तांत्रिक कारणास्तव विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपण मेस व स्वखर्चाकरीता पुरेशी रक्कम आपले बॅक खातेमध्ये जमा ठेवावी.**

Scanned with OKEN Scanner